**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शनिवार दिनांक ०४ एप्रिल २०२६**

**ठळक बातम्या**

1. **भारताचं एलपीजीवाहक जहाज 'ग्रीन सान्वी', होर्मुझ सामुद्रधुनी पार करून मुंबईच्या दिशेने रवाना.**
2. **भारतीय ज्ञानाचे वैश्विकीकरण तर वैश्विक ज्ञानाचे भारतीयीकरण आवश्यक- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचं नागपुरात प्रतिपादन.**
3. **नागपूर मनपा शिक्षकांच्या एआय प्रशिक्षणास प्रारंभ, शिक्षकांना मिळणार 'जनरेटिव्ह एआय' आणि 'मायक्रोसॉफ्ट कोपायलट'चे धडे.**
4. **लोकनेते दत्ता मेघे हजारोंच्या जीवनाचा आधार झाले- केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचं शोकसभेत प्रतिपादन, नागपूर आणि वर्धा इथं स्मारक उभारणार.**

---

'ग्रीन सान्वी'

पश्चिम आशियातल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर, भारतीय जहाज 'ग्रीन सान्वी', ४४ हजार टन एलपीजी घेऊन होर्मुझ सामुद्रधुनी पार करून मुंबईच्या दिशेनं रवाना झालं आहे. इराणनं होर्मुझच्या सामुद्रधुनीवर अनेक निर्बंध लादले असले, तरी भारतीय ध्वज असलेल्या जहाजांना सुरक्षितपणे जाण्याची परवानगी दिली आहे. युद्ध सुरू झाल्यापासून गेल्या महिन्याभरात होर्मुझच्या सामुद्रधुनीतून प्रवास करणारं हे सातवं भारतीय जहाज आहे. सामुद्रधुनीच्या पश्चिमेला अडकलेल्या १७ भारतीय जहाजांपैकी, 'ग्रीन आशा' आणि 'जग विक्रम' ही दोन जहाजं देखील एलपीजीनं भरलेली आहेत. या जहाजांना सामुद्रधुनी पार करण्याची लवकरच परवानगी मिळेल आणि एलपीजीच्या तुटवड्याचा सामना करणाऱ्या भारतीयांना मोठा दिलासा मिळेल, असं वृत्तसंस्थेनं म्हटलं आहे.

---

अश्विनी वैष्णव

देशातल्या गरीब आणि मध्यमवर्गीय प्रवाशांना रेल्वे प्रवासाचा सुखद आणि सुरक्षित अनुभव देणं, याला रेल्वे विभागाचं सर्वोच्च प्राधान्य असल्याचं रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी म्हटलं आहे. वैष्णव यांच्या अध्यक्षतेखाली रेल्वेच्या वरिष्ठ

अधिकाऱ्यांची महत्त्वाची बैठक नवी दिल्लीत झाली, त्यावेळी ते बोलत होते. प्रवाशांच्या गरजांनुसार सोयीसुविधांचा विस्तार आणि रेल्वेच्या आधुनिकीकरणावर या बैठकीत चर्चा करण्यात आली.

---------------------------------------------------------

महाराष्ट्र ज्ञानसभा

भारतीय ज्ञानाचे वैश्विकीकरण तर वैश्विक ज्ञानाच्या भारतीयीकरणातून विकसित भारत २०४७ चे ध्येय साकार करावयाचे असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. विश्वेश्वरैय्या राष्ट्रीय प्रौद्योगिकी संस्थेच्या सभागृहात 'विकसित महाराष्ट्रासाठी शिक्षण' या विषयावर महाराष्ट्र ज्ञानसभा आयोजित करण्यात आली आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली, विश्वेश्वरैय्या राष्ट्रीय प्रौद्योगिकी संस्थान, भारतीय प्रबंध संस्थान, शिक्षण संस्कृती उत्थान न्यास नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित महाराष्ट्र ज्ञानसभेचे उद्घाटन करताना मुख्यमंत्री आज मार्गदर्शन करीत होते. अध्यक्षस्थानी शिक्षण संस्कृती उत्थान न्यासचे राष्ट्रीय सचिव अतुल कोठारी होते, तर राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, व्हीएनआयटी शासी मंडळ अध्यक्ष डॉ. मदभूषी मदन गोपाल प्रामुख्याने उपस्थित होते. यावेळी भारतीय ज्ञानाच्या वैश्विविकीकरणाचीही गरज फडणवीस यांनी बोलून दाखवली -

***(होल्ड बाईट - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस - १२ सेकंद)***

जगात कोठेही विद्यापीठाची संकल्पना नसताना भारतात नालंदा, तक्षशिला, विक्रमशिला, काशी आदी जगमान्य विश्वविद्यालय होती. या खगोल, भूगोल, शल्यचिकित्सा, विज्ञान, व्याकरण, आर्किटेक्ट सर्व प्रकारच्या शिक्षण क्षेत्रातील सर्वोच्च ज्ञान येथे मिळत होते, यावरून आपण किती ज्ञानसमृद्ध होतो, असे चिनी पर्यटकाने लिहिलेल्या साहित्यातून दिसून येते, असे फडणवीस यावेळी म्हणाले.

---------------------------------------------------------

पोटनिवडणूक

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे होऊ घातलेली बारामती मतदारसंघाची पोटनिवडणूक बिनविरोध होण्यासाठी सर्व पक्षांनी सहकार्य करावं, असं आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं आहे. ते आज मुंबईत वार्ताहरांशी बोलत होते. आगामी पोटनिवडणुकीत बारामती मतदारसंघात रिक्त झालेल्या जागेवरून सुनेत्रा पवार निवडणूक लढवणार आहेत. सर्व पक्षांनी सुनेत्रा पवार यांना पाठिंबा देऊन महाराष्ट्राच्या राजकीय पंरपरेचं पालन करावं, असं आवाहन मुख्यमंत्र्यांनी केलं.

माजी गृहमंत्री दिवंगत आर आर पाटील यांच्या निधनानंतर त्यांच्या मतदारसंघातून पाटील यांच्या पत्नी सुमन पाटील या बिनविरोध निवडून आल्या होत्या, याची आठवणही यावेळी मुख्यमंत्र्यांनी करून दिली. येत्या २३ एप्रिलला ही निवडणूक होणार आहे.

-----------------------------------------------------------

‘सहज प्रणाली’

बुलडाण्याचे जिल्हाधिकारी डॉ.किरण पाटील यांच्या नाविन्यपूर्ण ‘सहज प्रणाली’ आणि ‘महसूल मित्र’ या उपक्रमांची राज्य सेवा हक्क आयोगानं विशेष दखल घेतली आहे. ‘एआय’ तंत्रज्ञानावर आधारित ‘बुलढाणा सहज सेवा महसूल’ या आराखड्याच्या माध्यमातून जिल्ह्यातील शेतकरी आणि सर्व स्तरातील नागरिकांना ऑनलाइन मोबाईलद्वारे कागदपत्र उपलब्धतेची सुविधा पुरवण्यात येत आहे. मुंबईत पार पडलेल्या आयोगाच्या ३१व्या बैठकीत या उपक्रमांचं सादरीकरण करण्यात आलं. यावेळी आयोगानं या उपक्रमांची प्रशंसा करत, ही सुविधा संपूर्ण महाराष्ट्रात लागू करण्याची शिफारस राज्य सरकारकडे केली आहे.

-----------------------------------------------------------

चंचल कुमार

माहिती आणि प्रसारण मंत्रालयाचे सचिव चंचल कुमार यांनी आज पुण्यात राष्ट्रीय चित्रपट संग्रहालय (नॅशनल फिल्म आर्काइव्ह ऑफ इंडिया) येथे भेट देऊन सुरू असलेल्या कामांचा आढावा घेतला आणि अधिकाऱ्यांशी संवाद साधला. यापूर्वी त्यांनी फिल्म अँड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया येथे भेट देऊन प्राध्यापकांशी चर्चा केली तसंच शैक्षणिक आणि पायाभूत सुविधांचा आढावा घेतला.

-----------------------------------------------------------

मनपा शिक्षक

नागपूर महानगरपालिका शाळेतील शिक्षकांना डिजिटल युगाशी सुसंगत बनवण्यासाठी आणि त्यांच्या अध्यापन पद्धतीत आधुनिकतेचा समावेश करण्यासाठी 'रोबोटेक्स इंडिया' संस्थेतर्फे आयोजित  कृत्रिम बुद्धिमत्ता प्रशिक्षणवर्गाला मनपाच्या अतिरिक्त आयुक्त वैष्णवी बी. यांनी आज भेट दिली. यावेळी त्यांनी जास्तीत जास्त शिक्षकांनी कृत्रिम बुद्धिमत्ता आत्मसात करून तिचा वापर आपल्या अध्यापनात करावा आणि विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाचं मार्गदर्शन करावं, असं आवाहन केलं. मनपाच्या भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी ई-लायब्ररी मध्ये 'इस्टॅब्लिशमेंट ऑफ मायक्रोसॉफ्ट एज्युकेटर एआय अकॅडमी फॉर स्किलिंग अँड इकॉनॉमिक एम्पॉवरमेंट'

(EASE) आणि 'डेसिग्नेशन ऑफ नागपूर रिजनल हब' या उपक्रमांतर्गत २ एप्रिलपासून हा प्रशिक्षणवर्ग घेतला जात आहे. प्रशिक्षणवर्गाला मनपाच्या शिक्षण विशेष समिती सभापती संतोषदेवी लढ्ढा यांनी भेट देत मार्गदर्शन केले. या प्रशिक्षणात शिक्षकांना प्रामुख्यानं 'जनरेटिव्ह एआय' आणि 'मायक्रोसॉफ्ट कोपायलट' सारख्या प्रगत डिजिटल टूल्सचा वापर करण्यास शिकवण्यात आले. मनपा शाळेतील शिक्षकांना तंत्रस्नेही बनवून शाळांचा दर्जा उंचावण्यासाठी हे प्रशिक्षण अत्यंत मोलाचे ठरणार आहे.

-------------------------------------------------------------

गणेश चार्लेवार

नागपूर महानगरपालिकेचे शिवसेना शिंदे गट पक्षाचे गटनेते गणेश चार्लेवार यांनी 'फुलांचे गुच्छ नकोत, फक्त पुस्तके' ही संकल्पना राबवत आपल्या पदग्रहण सोहळ्याला एक वेगळी आणि प्रेरणादायी दिशा दिली. या उपक्रमाअंतर्गत त्यांनी उपस्थित मित्र, कार्यकर्ते आणि मान्यवरांना पारंपरिक फुलांचे गुच्छ न आणता पेन, पेन्सिल, वह्या आणि इतर शैक्षणिक साहित्य आणण्याचं आवाहन केलं होते. त्यांच्या या आवाहनाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आणि मोठ्या प्रमाणात शैक्षणिक साहित्य संकलित करण्यात आले. हे साहित्य गरजू आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बळ विद्यार्थ्यांना वितरित करण्यात आले. या कार्यक्रमाला राज्यमंत्री आशिष जयस्वाल, विधान परिषद सदस्य कृपाल तुमाने यांच्यासह अनेक मान्यवर आणि शिवसैनिक उपस्थित होते.

-------------------------------------------------------------

दत्ता मेघे

लोकनेते दत्ता मेघे यांनी अतिशय कष्टातून स्वतःचे जीवन उभे केले आणि हजारोंच्या जीवनाचा आधार झाले. राजकारणात असतानाही त्यांनी पूर्णवेळ समाजकारण केले. अशी माणसं दुर्मिळ असतात आणि दत्ताभाऊ राजकारणातील दुर्मिळ व्यक्तिमत्व होते, या शब्दांत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी दत्ता मेघे यांना श्रद्धांजली अर्पण केली. यावेळी त्यांनी दत्ता मेघे यांच्या आठवणींना उजाळा दिला..

***(होल्ड बाईट - केंद्रीय मंत्री नितीन गडकरी १७ सेकंद)***

नागपुरातील व्हीसीए मैदान, जामठा इथं आज सर्वपक्षीय श्रद्धांजली सभेचे आयोजन करण्यात आले. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रमुख उपस्थिती होती. तर महापौर नीता ठाकरे, कामगार मंत्री आकाश फुंडकर, राज्यमंत्री डॉ. पंकज

भोयर, राज्यमंत्री आशीष जयस्वाल, राज्यसभा सदस्य माया ईवनाते , दत्ता मेघे यांचे सुपुत्र आमदार समीर मेघे, सागर मेघे यांच्यासह मेघे कुटुंबियांची उपस्थिती होती. दत्ताभाऊ मेघे हे जनसामान्यांचे, बहुजनांचे, गोरगरिबांचे नेते होते. अतिशय गरिबीतून जीवनाची सुरुवात करत स्वतःच्या कर्तृत्वाने आपल्या पायावर ते उभे राहिले. आमदार, खासदार, मंत्री अशा विविध भूमिका त्यांनी पार पाडल्या. सर्व लोक प्रेमाने त्यांना दत्ताभाऊ म्हणायचे. पण ते खऱ्या अर्थाने दाताभाऊ होते, या शब्दांत मुख्यमंत्री फडणवीस यांनी भावना व्यक्त केल्या. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दत्ता मेघे यांची दोन स्मारके करण्याचा विचार असल्याचे सांगितले. वर्धा आणि नागपूर अशा दोन्ही ठिकाणी ही स्मारके असतील असे ते म्हणाले.

-----------------------------------------------------------

हवामान

विदर्भात बुलढाणा जिल्हा वगळता इतर सर्व जिल्ह्यांत पुढील ३ ते ४ तासांत काही ठिकाणी मेघगर्जनेसह वादळी वाऱ्यांचा जोर वाढण्याची शक्यता आहे. काही ठिकाणी गारपीट होण्याची तर काही ठिकाणी हलक्या स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे.

-----------------------------------------------------------

अवकाळी पाऊस

वाशिमसह मानोरा, मंगरूळपीर, कारंजा या तालुक्यात वादळी वाऱ्यासह पडलेल्या अवकाळी पाऊस आणि गारपिटीमुळे काढणीस आलेल्या कांदा बीजाचे प्रचंड नुकसान झाले आहे. अमरावती जिल्ह्यात काल विजांच्या कडकडाटासह पाऊस झाला. याचा फटका गहू, मका, संत्रा पिकाला बसला आहे.

-----------------------------------------------------------